| | |
|---|---|
| दाखल दिनांक | - ०५.१२.२०२२ |
| नोंदणी दिनांक | - ०५.१२.२०२२ |
| निकाल दिनांक | - २३.०२.२०२३ |
| कालावधी | - ०० व. ०२ म.१८दि. |

**भडगाव येथील न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग (कोर्ट क.2) यांचे न्यायालयात, भडगाव जि.जळगाव.**
(पिठासीन अधिकारी – श्रीमती.एस.एस.चव्हाण)

**स.फौ.ख.क.234/2022**
**निशाणी क.12**

महाराष्ट्र शासन तर्फे
निरीक्षण राज्य उत्पादन शुल्क,
चाळीसगांव, ता.चाळीसगांव, जि.जळगाव. } ... **फिर्यादी**

**विरूध्द**

जितेंद्र दिलीप वाघ,
वय– 26 वर्षे, धंदा–मजुरी,
रा.यशवंतनगर, भडगांव,
ता.भडगाव, जि.नाशिक } ... **आरोपी**

**दोषारोप – मुंबई दारुबंदी कायदा कलम 65(ई) प्रमाणे**

---

**अभियोग पक्षातर्फे** – श्री. मनोज माने सहायक सरकारी अभियोक्ता
**आरोपीतर्फे** – श्री.व्हि.आर.महाजन, वकील

---

## न्यायनिर्णय
(दि.23 फेब्रुवारी, 2023 रोजी पारीत केला)

1. अभियोग पक्षाच्या खटल्याची हकीकत अशी आहे की, दि.30/05/2022 रोजी 19.00 वाजेच्या सुमारास मौजे. भडगांव शहरात यशवंतनगर भागातील हनुमान मंदिर परिसरात सार्वजनिक जागी आरोपी जितेंद्र दिलीप वाघ याने गैरकायदा 400/– रूपये किंमतीची गा.हा.भ.ची तयार दारू एका प्लॅस्टीक कॅनमध्ये भरून स्वतःचे कब्जात

बाळगुन तिची चोरटी विक्री करीत असतांना मिळुन आला.

2. फिर्यादीने आरोपी विरुध्द भडगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. सदर तक्रारीच्या आधारे आरोपी विरूध्द अपराध क्र. 122/2022 मुंबई दारुबंदी कायदा कलम 65(ई) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासाच्या दरम्यान अन्वेषण अधिकारी यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले. तसेच घटना स्थळ व जप्ती पंचनामा केला. एकूण तपासात आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र तयार करून न्यायालयात चौकशीसाठी पाठविले. तसेच आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 41(अ) प्रमाणे नोटीस अदा करून न्यायालयात हजर राहणेची समज दिली.

3. मी आरोपी विरूध्द निशाणी 10 प्रमाणे आरोपपत्र तयार करून त्यांना वाचून दाखविले असता त्यांनी सदर गुन्हा नाकबुल करून खटला चालविण्याची विनंती केली.

4. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून न आल्याने आरोपीविरूध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 313 अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

5. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यानुसार माझे विचारार्थ खालील प्रश्न उपस्थित होतात त्यांना मी माझे सकारण निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. 30/05/2022 रोजी 19.00 वाजेच्या सुमारास मौजे. भडगांव शहरात यशवंतनगर भागातील हनुमान मंदिर परिसरात सार्वजनिक जागी आरोपी जितेंद्र दिलीप वाघ हा गैरकायदा 400/— रूपये किंमतीची गा.हा.भ.ची तयार दारू एका प्लॅस्टीक कॅनमध्ये भरून स्वतःचे कब्जात बाळगुन तिची चोरटी विक्री करीत असतांना मिळुन आला. ? | ..नकारार्थी. |
| 2 | हुकूम काय झाला ? | अंतिम हुकूमाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

6. सदर खटला फौजदारी स्वरूपाचा असल्याने आरोपीवरील गुन्हा निर्विवादपणे सिध्द् करण्याची संपुर्ण जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. जर अभियोग पक्ष तसे सिध्द् करण्यास अपयशी ठरला तर संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायालयावर बंधनकारक आहे. त्या दृष्टीने अभिलेखावरील पुराव्याची छानणी करणे गरजेचे आहे.

7. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याचे दृष्टीने सदर प्रकरणात अभियोग पक्षाने एकुन एक साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. ती म्हणजे सा.क्र.1. धर्मा सुका जावरे यांची नोंदविण्यात आली. या मौखिक पुराव्या व्यतिरिक्त अभियोग पक्षाने फिर्याद हा दस्त कागदोपत्री पुरावा म्हणून अभिलेखावर घेवून नि. 1 वरील आदेशाप्रमाणे पुरावा बंद केलेला आहे. याउलट बचाव पक्षातर्फे त्यांनी त्यांच्या बचावासाठी कोणताही तोंडी अगर लेखी पुरावा सादर केलेला नाही.

**मुद्दा क.1 करीता :–**

8. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचा एकत्रितपणे विचार करण्यात आलेला असून त्याप्रमाणे कारणमिमांसा देण्यात आलेली आहे. साक्षीदार क्रमांक 1 धर्मा सुका जावरे हे अभियोग पक्षाच्या कहाणीप्रमाणे तथाकथीत घटने तील जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार आहे. त्यांचा पुरावा पहाता त्यांनी पंचनाम्यातील मजकुराविशयी त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. थोडक्यात त्यांनी अभियोग पक्षास पूरक अशी साक्ष दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांना फितूर घोषित करून त्यांचा उलट तपास घेतला असता त्यांनी त्यांचे उलट तपासात अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा शाबित होवू शकलेला नाही.

9. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी यांचे साक्षीस पुष्टी मिळेल अशा एकही स्वतंत्र प्रत्य क्षदर्शी साक्षीदारांची साक्ष ही नोदविण्यात आलेली नाही. तसेच दुस–या पंच साक्षीदारांची साक्ष देखील नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे फिर्यादीने वर्णनकेल्याप्रमाणे तथाकथीत घटनेबाबतची तथ्थ न्यायालयासमोर आणण्यास अभियोग पक्षास यश आलेले नाही.

10. सदर प्रकरणात रसायन विश्लेषकाचा/तज्ञांचा अहवाल अभिलेखावर सादर केलेला असला तरी परंतु अभियोग पक्षाने सदर अधिका–यांना अथवा इतर साक्षीदारांना तपासलेले नाही. सदर जप्त मुददेमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन मिळाला किवा कसे या महत्वाच्या बाबी अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या खटल्यातील सत्यतेबाबत संशय निर्माण होतो आणि त्या संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायोचित होईल. सबब, आरोपीवरील गुन्हा सिध्द होत नसल्याने मुददा क 1 चे उत्तर नकारार्थी नोंदवून खालील आदेष पारीत करीत आहेः–

## आदेश

1 आरोपी जितेंद्र दिलीप वाघ यास मुंबई दारुबंदी कायदा कलम 65 (ई) या गुन्हयाचे दोषांतून फौ.प्र.स. कलम 255(1) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

2 आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात यावा.

3 फौ.प्र.सं.कलम 437–अ मधील तरतुदीनुसार आरोपीने यापुर्वी दिलेला जामीन कायम ठेवत असल्यामुळे तो मंजूर केला आहे जामीनबंधपत्र सहा महीन्याच्या कालावधीनंतर आपोआप रदद झाल्याचे समजण्यात यावे.

4 अपिलाचा कालावधी संपल्यानंतर सदर गुन्हयातील जप्त मुद्येमालाची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर. )

सही/–

दि.23/02/2023

(एस.एस.चव्हाण)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(कोर्ट क.2)
भडगाव.